# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ / आषाढ २३, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### आकापूर-मरेगाव (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये नवीन उद्योग पुनर्स्थापित करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(१) * २९९५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकापूर-मरेगाव (ता.मूल, जि.चंद्रपूर) औद्योगिक क्षेत्रामध्ये मागील ३० वर्षांचा कालावधीमध्ये कोणतेही नविन उद्योग स्थापित न झाल्याने तसेच सद्य:स्थितीत सुरु असलेल्या उद्योगांमध्ये स्थानिकांना डावलून परराज्यातील मजूरांचा भरणा करण्यात येत असल्यामुळे तालुक्यातील युवक रोजगारासाठी बाहेरील राज्यात स्थलांतरित होत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आकापूर-मरेगाव औद्योगिक क्षेत्रामध्ये नविन उद्योग स्थापन करून सद्य:स्थितीत सुरू असलेल्या उद्योगात स्थानिक युवकांना रोजगार देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) हे खरे नाही.

आकापूर-मरेगांव येथे मूल औद्योगिक क्षेत्राकरीता १९४.२६ हे.आर. जागा संपादन करण्यात आलेली आहे. सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण ५० भूखंडांचे आरेखन करण्यात आले असून ४८ भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत. २ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत. १० भूखंडावर उद्योग सुरू आहे.

मे. कार्निवल इंडस्ट्रिज प्रा. लि., मे. महिला आर्थिक विकास महामंडळ, मे. दिनानाथ अलाईड स्टील, मे. जी. आर. क्रिष्णा फेरो अलाईड प्रा. लि., मे. भाग्यलक्ष्मी मेटल प्रा. लि., मे. सॉइलॉन स्टील प्रा.लि., मे. पृथ्वी ॲलाईज प्रा.लि., मे. राजुरी स्टील प्रा.लि., मे. ग्रेटा एनर्जी लि., मे. चिंतामणी फॅब्रिकेशन प्रा.लि. इत्यादि मोठ्या उद्योगांना भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रात अंदाजे रुपये ३०७५ कोटींची गुंतवणुक होणार असून प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष ४७९५ रोजगार उपलब्ध होणार आहेत. स्थानिक रोजगाराबाबत शासनाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही होईल याची दक्षता घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमधील पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२) * ३१३१ श्री.राजेश राठोड, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना व लातूर जिल्हयांतील सिंचन प्रकल्पांमध्ये माहे एप्रिल, २०२५ अखेर केवळ ३६ टक्के पाण्याचा साठा शिल्लक असल्याचे निदर्शनास आले असून मराठवाड्यात ३७७ गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, या दुष्काळग्रस्त गावांमध्ये ४३३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयांमधील १६६ गावांना टँकरने आणि २६७ विहिरी अधिग्रहित करुन पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यातील बहुतांशी जिल्ह्यात सात दिवसांत एकदा पाणीपुरवठा केला जात असून जालना जिल्ह्यात शहरातील पाण्याचे नियोजन योग्य पध्दतीने होत नसल्याने पुर्वी ५ दिवसाआड होणारा पाणीपुरवठा आता ८ ते १० दिवसाआड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठवाड्यातील उक्त जिल्हयांमधील पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०२५ अखेर मराठवाडा विभागातील टंचाईग्रस्त २३२ गावे व ६१ वाड्यांमध्ये एकूण ३६६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०२५ अखेर टंचाई अंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी उक्त जिल्ह्यांमध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

| जिल्हा | गाव | वाड्या | टँकर | अधिग्रहीत विहीरी |
|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | १५४ | १८ | २३० | १२९ |
| जालना | ५८ | १५ | ९८ | १२७ |
| नांदेड | ०४ | १५ | १४ | ११४ |
| लातुर | ७८ | ०० | ०३ | ९० |
| **एकूण** | **२९४** | **४८** | **३४५** | **४६०** |

(३) अंशत: खरे आहे.

मराठवाड्यातील जालना व हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये अस्तित्वातील उद्धवापासून उपलब्ध होणाऱ्या पाण्यानुसार २- ३ दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो.

जालना महानगरपालिकेमार्फत जालना शहरास जायकवाडी व घाणेवाडी या जलाशयातुन सरासरी ०६ ते ०७ दिवसानंतर ६० ते ७५ मिनीटांकरीता (एक ते सव्वा तास) पाणीपुरवठा केला जात आहे.

माहे मार्च-एप्रिल २०२५ मध्ये शहरातील जुनी १९८० ची मुख्य जालना-अंबड संयुक्त पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईन फुटल्यामुळे व जायकवाडी-अंबड दरम्यानची मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे नियमित पाणी पुरवठ्यात अडथळे आले होते. मात्र तात्काळ दुरुस्ती करून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील ग्रामीण भागामध्ये मध्ये जल जीवन मिशन कार्यकमाची अंमलबजावणी करण्यात येत असून या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई ५५ लिटर प्रती दिन गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्याचे उदिष्ट आहे.

जल जीवन मिशन अतंर्गत मराठवाडा विभागातील जिल्हा निहाय मंजूर योजना/ सद्य:स्थिती याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | मंजूर योजना | पूर्ण योजना | प्रगती पथावरील योजना |
|---|---|---|---|
| छ.संभाजीनगर | ११८५ | ६९० | ४९५ |
| जालना | ७५२ | २५९ | ४९३ |
| बीड | १२९९ | ३७७ | ९२२ |
| परभणी | ७४० | ३६१ | ३७९ |
| हिंगोली | ६९५ | २३६ | ४५९ |
| नांदेड | २१७८ | ११२४ | १०५४ |
| धाराशिव | ६७२ | ३६७ | ३०५ |
| लातुर | ९५६ | ५०७ | ४४९ |
| **एकूण** | **८४७७** | **३९२१** | **४५५६** |

तसेच जालना शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत लहान आणि मध्यम शहरांसाठी शहरी पायाभूत सुविधा विकास योजना (UIDSSMT) योजना पूर्ण क्षमतेने चालविण्याकरीता अंबड येथे नवीन ३५ MLD क्षमतेचा जलशुद्धीकरण केंद्र बांधणे व इतर अनुषंगिक कामे करण्याकरीता मंजुरी दिलेली असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील काम पूर्ण झाल्यानंतर जालना शहरास ०१ दिवसाआड पाणीपुरवठा करणे शक्य होईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मृद व जलसंधारण विभागाकरिता मंजूर आकृतीबंधानुसार पदांचे समायोजन पूर्ण करण्याबाबत

**(३) * ३४२६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी दिनांक ५ जून, १९९२ मध्ये जलसंधारण विभागाची स्थापना झाल्यानंतर विभागाचे कामकाज स्वतंत्र न ठेवता ग्रामविकास व कृषी विभागाशी जोडण्यात आले व दिनांक ३१ मे, २०१७ रोजी कृषी विभागातून मृद व जलसंधारण विभाग वेगळा करण्यात आला असून जलसंपदा विभागातील स्थानिक स्तरावरील तात्पुरत्या प्रतिनियुक्तीवर असलेली ३ हजार १५६ आणि जिल्हा परिषदेकडील २ हजार ९५९ व कृषी विभागाची ९ हजार ९६७ पदे जलसंधारण विभागात समायोजित करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १९७२ पासून जलसंधारणाच्या झालेल्या सर्व प्रकारांच्या कामांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, हे सर्वेक्षण कृषी व जलसंधारण विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत करण्याचे नियोजीत केले होते, मात्र अद्यापही कृषी विभागाने एकही कर्मचारी जलसंधारण विभागाकडे वर्ग केलेला नसून व सर्वेक्षणांच्या कामास कृषी सहायकांनी नकार दिल्यामुळे जलसंधारणाच्या कामांचे सर्वेक्षण ठप्प झाले असून, विभागाकडे मनुष्यबळाअभावी विविध योजना राबविताना मर्यादा येत असल्याने शेतकऱ्यांच्या कामे प्रलंबित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मृद व जलसंधारण विभागाची निर्मिती झाल्यानंतर या विभागाला कृषी विभागाकडील नऊ हजार कर्मचारी देण्यास तत्कालीन मंत्रीमंडळाने मान्यता दिली होती, मात्र कृषी विभागाने त्यास नकार दिल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्वतंत्र मृद व जलसंधारण विभागासाठी सन २०१७ साली १६ हजार ४७९ पदांच्या सुधारित व फेररचनेच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मृद व जलसंधारण विभागाच्या मंजूर आकृतिबंध पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभाग तसेच जि.प.ल.पा.विभागातून पदे समायोजित करण्याचा निर्णय घेतला होता.तथापि, कृषी विभागाकडून पदे समायोजित झालेली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

मृद व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी (Ground Truthing) करण्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांसमवेत वन विभाग तसेच कृषी विभागातील कृषी सहायक व कृषी पर्यवेक्षक यांना दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, कृषी सहायक व कृषी पर्यवेक्षक यांनी सदर कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्यामुळे रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या पी.टी.ओ. सी.डी. ओ., ग्राम रोजगार सेवक, ए.पी.ओ यांना शासन पत्र दिनांक १६/०५/२०२५ अन्वये पथक प्रमुख म्हणुन नेमले असून प्रत्यक्ष स्थळ पडताळणी कार्यक्रम प्रगतीपथावर आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) दिनांक ३१ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मृद व जलसंधारण विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेकरीता एकूण १६४७९ पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता.तथापि, कृषी विभागाशी संबंधित पदे या विभागाकडे वर्ग न झाल्यामुळे, विभागाकडून कृषी विभागाशी संबंधित पदे वगळून सध्याच्या मंजूर एकूण आकृतीबंधातील ६४८३ पदे (महाराष्ट्र जलसंधारण मंडळाच्या २ पदांसह) व त्याव्यतिरीक्त वाढीव ३६०३ पदांचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला होता.त्यासंदर्भात उपसमितीने दिनांक १६/०५/२०२५ रोजीच्या व उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक १८.०६ृ.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये या विभागास मंजूर आकृतिबंध ६४८३ व वाढीव २२८४ पदे अशा एकूण ८७६७ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सुधारित आकृतीबंधाचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रुग्णवाहिका सेवेकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) * ३०२४ श्री.एकनाथराव खडसे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या जननी सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत गर्भवती महिलांच्या सुविधेसाठी १०२ क्रमांकाच्या तीन हजारांहून अधिक रुग्णवाहिका सुरु करण्यात आल्या असून, सदर रुग्ण वाहिकेवरील वाहन चालकांचे वेतन ५-६ महिन्यांपासून निधी अभावी प्रलंबित असल्याने वाहन चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे तसेच या रुग्णवाहिकांमध्ये इंधन खर्चासाठी निधी उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील गर्भवती महिला व रुग्णांसाठी अत्यावश्यक असलेली ‘१०२ रुग्णवाहिका सेवा’ निधी अभावी बंद पडणार असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी प्राप्त होत असलेला निधी केंद्र शासनाकडून काही महिन्यांपासून मिळत नसल्याने जिल्हा चिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक हे जानेवारीपासून पेट्रोल पंप चालकांकडून उसनवारीवर रुग्णवाहिकेमध्ये पेट्रोल भरत असून अनेक ठिकाणी पेट्रोलच्या देयकांचा खर्च लाखो रुपयांहून अधिक झाल्याचे निदर्शनास आले असून, सदर निधी अद्यापपर्यंत केंद्र शासनाकडून प्राप्त न झाल्याने आरोग्य केंद्रांचे प्रमुख अडचणीत येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील गर्भवती महिलांसाठी लाभदायक ठरलेली सदर योजना सुरु राहण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

राज्यात एकूण १०२ क्रमांकाच्या ३३३२ रूग्णवाहिकामार्फत गर्भवती महिला, बालकांना व रूग्णांना सेवा पुरविली जाते. यापैकी १११७ रूग्णवाहिकांवर राष्ट्रीय आरोग्य मिशन तर्फे वाहनचालक पुरविले असून सन २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाकडून निधीचा शेवटचा हप्ता प्राप्त न झाल्यामुळे या वाहनचालकाचे काही महिन्यांचे वेतन प्रलंबित राहिले होते. मात्र सद्य:स्थितीत केंद्र शासनाकडून राज्यास निधी प्राप्त झाला असून दिनांक १९/०५/२०२५ व दिनांक २५/०६/२०२५ रोजी सर्व जिल्हांना वाहनचालकांना वेतन देण्यासाठी निधी वर्ग करण्यात आला आहे.
(३) रूग्णवाहीकांसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि राज्यनिधीतून अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे आणि ही योजना कार्यान्वित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील साखरा (ता.सेनगाव) व लक्ष्मण नाईक तांडा (ता.औंढा नागनाथ) येथील जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गतची कामे पूर्ण करण्याबाबत

**(५) * २६८८ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे साखरा (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेची कामे अपूर्ण असल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे व लक्ष्मण नाईक तांडा (ता.औंढा नागनाथ) येथे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत आढावा घेऊन मौजे साखरा येथील जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गतच्या पाणीपुरवठा योजनेतील कामे तातडीने पूर्ण करण्याकरीता व लक्ष्मण नाईक तांडासह औंढा नागनाथ तालुक्यातील अनेक गावांमधील पाणीटंचाई दूर करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मौजे साखरा या गावाचा समावेश जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या कवठा व ९ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत करण्यात आला असून दिनांक २२/०५/२०२५ पासून या गावास पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. तसेच मौजे लक्ष्मण तांडा (ता.औंढा नागनाथ) येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे काम हिंगोली जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे. मौजे लक्ष्मण नाईक तांडा योजना सुधारित होत असून सदर योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

मौजे साखरा गावामध्ये सद्य:स्थितीत नळ पाणीपुरवठा सुरु असून योजनेत समाविष्ट असलेल्या वितरण व्यवस्थेची किरकोळ कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील ११७ गावांसाठी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद हिंगोली मार्फत ११४ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे घेण्यात आली असून त्यापैकी ३६ कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली असून १९ गावे "हर घर जल" घोषित करण्यात आलेली आहेत. तसेच, जल जीवन मिशनच्या माध्यमातून ७६ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्यात आला आहे. औंढा नागनाथ तालुक्याअंतर्गत २३ गावांमध्ये पाणी पातळी कमी झाल्यामुळे २९ विहिर/विंधन विहिर अधिग्रहण करुन तसेच, एक गांव व तीन तांड्यांसाठी २ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काकडकरा तळेगाव (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात बनावट कागदपत्रे सादर करुन शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(६)** * **३३०७ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काकडकरा तळेगाव (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयातील ठेकेदार हे १२ वी नापास असतानाही त्यांनी खोटे कागदपत्रे सादर करून सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणी करून त्याआधारे ९ कोटी ५ लाख ७८ हजार रुपयांची कंत्राटी कामे केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेकेदार यांनी खोटी व बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल होऊनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने नोंदणी प्रमाणपत्र रद्द न करता त्यांना कामे देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदाराने खोट्या नोंदणी प्रमाणपत्रावर मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्यामुळे त्यांना देण्यात आलेल्या कामांची चौकशी करून शासनाच्या निधीचा झालेला अपव्यय संबंधित दोषीकडून वसूल करून घेण्याबाबत मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीनुसार ठेकेदार व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तत्कालीन कंत्राटदार नोंदणी नियमानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता करीता "वर्ग-६" चे नोंदणी प्रमाणपत्र देण्याची तरतूद आहे. परंतु, श्री.सचिन होले यांनी, "वर्ग-५ स्थापत्य अभियंता" नोंदणी प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव दाखल केला होता.त्यानुसार श्री.सचिन होले यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मंडळ कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडून "वर्ग-५ स्थापत्य" करीता कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र देण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, चंद्रपूर कार्यालयाकडून मंजूरी देण्यात आली. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभागीय कार्यालय, वर्धा या कार्यालयाकडून सदर प्रमाणपत्रावर "वर्ग-५ (स्थापत्य) सुशिक्षित बेरोजगार अभियंता" असे अनवधानाने टंकलिखित झाले आहे. श्री.सचिन होले यांना सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

श्री.सचिन होले यांना, "वर्ग-५ स्थापत्य" कंत्राटदार म्हणून दिलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची वैधता दिनांक २४/०३/२०११ ते दिनांक २०/०३/२०१४ पर्यंत होती. तद्नंतर सदरच्या नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही. सदर नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे सदर कंत्राटदारास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मंडळ कार्यालय, चंद्रपूर क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कुठलेही कंत्राट देण्यात आलेले नाही. तसेच, जल जीवन मिशन अंतर्गत वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात पाणीपुरवठा योजनेची कामे सदर कंत्राटदारास देण्यात आलेली नाहीत.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोकण विभाग, ठाणे या कार्यालयामार्फत सन २०१४ मध्ये श्री.होले यांना नियमित "वर्ग-३ चे कंत्राटदार" म्हणून नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर नोंदणी प्रमाणपत्राची वैधता सन २०१४ ते २०१७ पर्यंत होती.

सदर कंत्राटदारावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ कार्यालय, चंद्रपूर या कार्यालयाकडून गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मा.लोकप्रतिनिधींच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या निवेदनात नमूद श्री.सचिन होले यांच्या "वर्ग-५ स्थापत्य व वर्ग-३ चे कंत्राटदार" म्हणून नोंदणी प्रमाणपत्राची वैधता संपुष्टात आलेली असून वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात जल जीवन मिशनची कामे देण्यात आलेली नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची कोट्यवधी रुपयांची तूट भरुन काढण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(७) * ३००५ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुंतवणूकीच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ७ हजार ३३७ कोटी रुपये इतकी तूट नोंदविण्यात आली असून शासनाकडून राज्यात मोठी गुंतवणूक आणण्यासाठी प्रयत्न होत असताना एवढी मोठी तूट आल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळावर आर्थिक संकट ओढावलेले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची जबाबदारी या महामंडळावर असून राज्यात मोठे उद्योग निर्माण झाले असतानाही इतकी मोठी महसूली तूट निर्माण झाल्याने राज्यात येणाऱ्या उद्योगांसाठी सोई-सुविधा पुरविण्यास या महामंडळास अडचण निर्माण होत असून राज्यात औद्योगिक क्षेत्र विकास महामंडळाची कोट्यवधी रुपयांची तूट भरुन काढण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या अनुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रुपये १४१६.८२ कोटी इतकी तूट आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने म.औ.वि. महामंडळास स्वत:साठी अर्थप्राप्तीचे पुरेसे मार्ग प्राप्त करुन घेण्यासाठी कर्ज घेण्यास म.औ. विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या ४०६ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. आहे.

जमीन अधिग्रहण,अभियांत्रिकी विभागाची चालू व प्रस्तावित कामे आणि महसूली खर्चासासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात निधी उपलब्धतेसाठी म.औ.वि. महामंडळास कर्ज घेण्यास राज्य शासनाची मान्यता मिळणेबाबत म.औ.वि. महामंडळाकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावासंदर्भात पडताळणी करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचे थकीत वेतन अदा करणेबाबत

**(८) * २५९६ श्री.योगेश टिळेकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सत्यजीत तांबे, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयासह ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी तुटपुंज्या मानधनावर कार्यरत असून त्यांना मागील तीन महिन्यांचे वेतन मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'एनएचएम' योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीतून केंद्राच्या हिश्श्याचे ८०० कोटी रुपये प्रलंबित असल्यामुळे राज्य शासनाला कर्मचाऱ्यांचे वेतन देता आलेले नाही, त्यामुळे राज्यातील १२ पेक्षा अधिक संघटनांनी कृती समिती तयार करून आंदोलनाचा इशारा देऊन काम बंद करण्याचा इशारा दिला असून कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या या असहकार आंदोलनामुळे आरोग्य व्यवस्था विस्कळीत होवून सामान्य जनतेच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यात एकूण ६० प्राथमिक आरोग्य केंद्र, १२ उपकेंद्रे आणि दोन उपजिल्हा रुग्णालये असून या रुग्णालयांकरीता फक्त ७२ रुग्णवाहिका असून जिल्ह्यात माता व बालमृत्यूचे प्रमाण अधिक असताना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या रुपये ९० कोटींच्या नवीन आराखड्याला अद्यापही मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या अमरावती, हिंगोली व यवतमाळ जिल्ह्यात पंधराव्या वित्त आयोगातील राखीव निधीतून सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत तसेच राज्यातील वैद्यकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) केंद्र शासनाकडून माहे जानेवारी, २०२५ पासून निधी प्राप्त न झाल्याने मानधन प्रलंबित राहिले होते. सध्या केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असून माहे मे २०२५ अखेर पर्यंतचे मानधन अदा करण्यासाठी दिनांक २४/०६/२०२५ रोजी जिल्हयांना निधी वितरीत केलेला आहे. सदर वितरीत निधीमधुन मानधन अदा करावयाची कार्यवाही सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२५ पासून निधी प्राप्त करुन घेण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत होता.निधी प्राप्त होताच वेतन अदा केले जाईल याबाबत सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना आश्वस्त करण्यात आले होते. परिणामी आंदोलन झाले नाही.

(३) अमरावती जिल्ह्यात एकूण ५९ प्राथमिक आरोग्य केंद्र, ३३४ उपकेंद्र आणि ६ उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय ८ असून या रुग्णालयाकरीता १५० रुग्णवाहिका आहे. अमरावती जिल्हयांस सन २०२५-२६ साठी एकूण रुपये ८१.२८ कोटी इतकी तरतूद मंजूर आहे.

(४) केंद्र शासनाकडून माहे जानेवारी २०२५ पासून निधी प्राप्त न झाल्याने मानधन प्रलंबित राहिले होते. सध्या केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असून माहे मे २०२५ अखेर पर्यंतचे मानधन अदा करण्यासाठी दिनांक २४/०६/२०२५ रोजी जिल्हयांना निधी वितरीत केलेला आहे. सदर वितरीत निधीमधुन मानधन अदा करावयाची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यांतील अवैधरित्या गर्भलिंग निदान करणाऱ्या केंद्रांवर कारवाई करणेबाबत

**(९) * २७६३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यामध्ये मुलींच्या जन्मदर कमी होत असून या भागातील अनेक सोनोग्राफी केंद्रावर अवैधरित्या छुप्या पध्दतीने गर्भलिंग निदान केले जात असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला आयोगाच्या सदस्या, आरोग्य उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी, पीसीपीएनडीटी नोडल ऑफिसर व अकोल्यातील काही डॉक्टर यांच्या सहकार्याने या नियमबाह्य सोनोग्राफी व गर्भपात केंद्रावर सन २००८ ते सन २०१२ दरम्यान कारवाई करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यांमधील सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांवर अशाचप्रकारे कारवाई करण्याची मागणी जनतेकडून होत असल्याने शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, दैनिक सकाळ मध्ये दिनांक ४/०३/२०२५ रोजी अकोला गर्भलिंग निदानाचे "हॉटस्पॉट" अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती. परंतु सदर बातमी वस्तुस्थितीवर आधारित नाही.

सीआरएस डाटा बेसच्या माहितीनुसार सन २०२२ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये मुलींच्या जन्मदरात वाढ झालेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अश्याप्रकारे कारवाई करण्याबाबतची मागणी जनतेकडून प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही. तथापि, अकोला परिमंडळ क्षेत्रासह सर्व राज्यात जिल्हा शल्य चिकित्सक व वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका यांचे कार्यक्षेत्रातील सर्व नोंदणीकृत सोनोग्राफी व गर्भपात केंद्राची दर तिमाही तपासणी समुचित प्राधिकारी यांचे मार्फत करुन सर्व राज्यात पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन होणार नाही याकरीता स्टिंग ऑपरेशन (डिकॉय केस) राबविण्यात येतात. तसेच टोल फ्री क्रमांक १८००-२३३४४७५ /१०४ वर प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि पंतप्रधान आयुष्मान भारत योजनेंतर्गत रुग्णालयांची थकित देयके अदा करण्याबाबत

**(१०) * २४७३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीबांना मोफत उपचार मिळावेत याकरीता महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि पंतप्रधान आयुष्मान भारत योजना सुरु करण्यात आली असून, या योजनेंतर्गतच्या संबंधित रुग्णालयांची गरीब रुग्णांच्या उपचारांची रुपये २७० कोटी एवढ्या रकमेची देयके शासनाने थकविल्याने रुग्णालय व्यवस्थापनाने या योजनेतंर्गत रुग्णांना उपचार देणे बंद केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गरीब रुग्णांच्या आरोग्यसेवेवर याचा परिणाम होत असल्याने याबाबत शासनाने आढावा घेऊन संबंधित रुग्णालयांचे महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि पंतप्रधान आयुष्मान भारत योजनेंतर्गत थकित असलेल्या देयकांची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच उक्त प्रकरणी दिरंगाईसाठी जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारची बातमी दिनांक ६/०४/२०२५ रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले. तथापि, या कालावधीत कोणत्याही रूग्णालयाने थकित देयके न मिळाल्याकारणाने योजनेतील उपचार बंद केले, अशी बाब उद्भवलेली नाही.

(२) १ जुलै, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत अंगीकृत रुग्णालयांकडून ७,७९,७२२ उपचारांसाठी सुमारे रुपये २३८०.०२ कोटी (रुपये दोनहजार तीनशे ऐंशी कोटी दोन लक्ष) रकमेचे दावे प्राप्त झाले आहेत. यापैकी ७,४२,६५६ उपचारांसाठी रुपये २०९३.४४ कोटी (रुपये दोनहजार त्र्याण्णव कोटी चव्वेचाळीस लक्ष) रकमेचे दावे अंगीकृत रुग्णालयांस अदा करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कैनाड, डोंगरीपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गर्भवती मातेचा नवजात बालकासह आरोग्य सुविधांअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(११) * ३११३ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कैनाड, डोंगरीपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील एका २५ वर्षीय मातेचा आणि तिच्या नवजात बाळाला वेळेवर आरोग्य सुविधा न मिळाल्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि पालघर जिल्ह्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

कैनाड, डोंगरीपाडा (ता.डहाणू जि.पालघर) येथील २५ वर्षीय गर्भवती महिला दिनांक २७. ०४. २०२५ रोजी सकाळी ११.१० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र आशागड येथे उपचाराकरीता आणण्यात आले होते. सदर गर्भवती मातेची तपासणी केली असता,बाळाचे ठोके ऐकू न आल्याने त्यांना त्वरीत खाजगी वाहनाने डहाणू उपजिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल केले होते. स्थानिक आशा कार्यकर्ती यांच्या माहितीनुसार दिनांक २६/०४/२०२५ रोजी ही महिला काम करताना पडली होती.बाळाचे उपजत मृत्यू झाले होते. डहाणू उपजिल्हा रुग्णालय येथे स्त्रिरोग तज्ञ यांच्याकडून सदर महिलेची प्रसुती करण्यात आली. प्रसूतीनंतर सदर महिलेस Abruptio Placenta झाल्याचे निदान झाले. Abruptio Placenta मुळे प्रसुतीनंतर जास्त रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांच्यावर आवश्यक औषोधोपचार करण्यात आले आणि रक्तपुरवठा ही करण्यात आला.तथापि, उपचारादरम्यान महिला रुग्णाची प्रकृती खालावल्याने त्यांचेवर अतिदक्षता विभागात (आयसीयु) उपचार करणे आवश्यक झाले असून त्यांना १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहीकेव्दारे जिल्हा रुग्णालय वलसाड येथे संदर्भीत करण्यात आले. परंतु संदर्भ सेवेदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सदर महिलेस आवश्यक ते सर्व उपचार देण्यात आले होते.

(२) होय.

सदर घटनेची चौकशी त्रिसदस्यीय समितीमार्फत दिनांक ०३/०५/२०२५ रोजी करण्यात आली. चौकशी मध्ये निदर्शनास आले की, स्त्रीरोगतज्ञ यांच्या देखरेख खाली उपचार झाले असून आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या.चौकशीत मातेचा मृत्यू हा “ Haemorrhage shock due to Antepartum Haemorrhage with Postpartum Haemorrhage मुळे झालेला असल्याचे चौकशी अहवालात नमूद आहे.

पालघर मध्ये अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे उपायोजना करण्यात येतात.

१) माता-मृत्यू अन्वेषणची दरमहा बैठक घेण्यात येतात व माता मृत्यू होवू नये याची कारणे शोधून नियोजन करण्यात येते.

२) जिल्हास्तरावरुन दर आठवड्याच्या सोमवारी जोखमीच्या मातांबाबत व्हीसी व्दारे आढावा घेण्यात येतो. संस्थास्तरावर प्रसुती होण्याकरीता आर. सी. एच पोर्टेलवर नोंदणी करण्यात येवून पाठपुरावा व संदर्भसेवा देण्यात येतात.

३) मातेस गाव/ पाड्यातून दवाखान्यात जाण्याकरीता टोल फ्री वाहन व्यवस्था १०८, १०२ उपलब्ध करुन देण्यात येते. १०८ च्या २९ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. तसेच गावपातळीवर संदर्भ विशेष वाहन व्यवस्था करण्यात आलेली आहे.

४) गरोदर मातांच्या अपेक्षित प्रसुती दिनांक व ठिकाण याचे नियोजन व पाठपुरावा केला जातो. EDD-EPD अद्यावत केली जाते.

५) जननी सुरक्षा कार्यक्र व अन्य योजनांतर्गत गर्भवती मातांची मोफत तपासणीसह आर्थिक अनुदानाचा लाभ देण्यात येतो.

६) Born healthy कार्यक्रमाव्दारे माता /बाल मृत्यूदर कमी करणे

७) स्थलांतरीत कुटुंबांची आरोग्य तपासणी करीता विशेष स्थलांतरीत शिबीरांचे तसेच परत आल्यावर पुनरागमन शिबीराचे आयोजन केले जाते.

८) ६ ठिकाणी पोषण पुनवर्सन केंद्र कार्यान्वित आहे तर ग्रामिण रुग्णालय तलासरी येथे केंद्र कार्यान्वित करण्याचे प्रक्रिया सुरु आहे.

९) आहार,विश्रांती,जोखीम, स्तनपान, लसीकरण इत्यादि बाबत कार्यशाळा व समुपदेशन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) शहरातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना करिता सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) * २४९२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) शहरात सुरू करण्यात आलेला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ‘आपला दवाखाना’ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रात दोन डॉक्टर, एमपीडब्ल्यू, ए.एन.एम. नर्स, सुरक्षा रक्षक आणि अशा पाच पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या होत्या, मात्र केवळ महिनाभरातच या आरोग्य केंद्राच्या ठिकाणी वीज, पाणी, कर्मचारी व इतर विविध सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येथील नियुक्त डॉक्टर हे केंद्र सोडून त्यांच्या मूळ गावी रुजू झाल्याने मागील काही महिन्यांपासून हे आरोग्य केंद्र बंद अवस्थेत असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड शहरातील काजळपुरा भागात दुसरे नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र मंजूर झाले आहे तथापि, या ठिकाणी असलेल्या सभागृहाच्या कामामुळे अजूनही केंद्र सुरूच झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाडमधील आपला दवाखाना सुरू करून सदर केंद्रास डॉक्टर व कर्मचारी वर्गाची सेवा तसेच पाणी व वीजेची सुविधा उपलब्ध करून रुग्णांची गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) अंशतः खरे आहे.

(अ) महाड येथे दोन दवाखाने चालू करण्यात आले होते. (i)हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना- भाजी मंडई आणि (ii)नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र- तांबडभुवन.

(ब) यापैकी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना करीता वैद्यकीय अधिकारी (MBBS) (१), स्टाफ नर्स (१), एमपीडब्लु (१), क्लिनिंग स्टाफ (१), सेक्युरिटी गार्ड (१) अशाप्रकारचा अधिकारी / कर्मचारी वर्ग मंजूर करण्यात आलेला असून तेवढी पदे भरण्यात आलेली होती. मात्र दवाखान्यातील वैदयकिय अधिकारी व स्टाफ नर्स यांनी २०२३ मध्ये आणी MPW यांनी एप्रिल २०२५ मध्ये राजीनामा दिल्यामुळे मनुष्यबळा अभावी तो दवाखाना बंद झालेला आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी NEET PG च्या तयारी साठी राजीनामा दिलेला होता.

(क) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र तांबडभुवन येथे चालू अवस्थेत आहे.

(२) हे खरे नाही.

महाड शहरातील काजळपुरा भागात नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर झालेले असून सदर ठिकाणी सभागृहाच्या कामामुळे त्याचे स्थळ बदलून सदरचे आरोग्यवर्धिनी केंद्र महाड शहरात तांबडभुवन येथे चालू करण्यात आले आणी ते सद्य:स्थितीत आरोग्य सेवा पुरवित आहे.

(३) या क्षेत्रासाठी तूर्त मोबाईल मेडीकल युनिट (MMU) यांच्या मार्फत आरोग्य सेवा सुरू करण्यात आली आहे.पदभरती साठी जाहिरात देण्यात आली असून आदिवासी बहुल जिल्ह्यासाठी बिंदूनामावली निश्चित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धानोरा बु. (ता.जिंतुर, जि.परभणी) येथील बंधारा बांधण्याच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(१३)** * **२४२६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धानोरा बु. (ता.जिंतुर, जि.परभणी) येथे बंधारा बांधण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी जलसंधारण महामंडळाने रुपये १.५० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देताना प्रकल्पाची साठवण क्षमता ९१.२१ सहस्त्र घन मीटर असून या परिसरातील २४ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याचे नमुद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यास १:१००० मिटर असा उतारा आवश्यक असतो परंतु येथे बंधाऱ्याचे पात्रच नाही तर ओघळ नाला असल्याने यासाठी ३०० मिटरचा कृत्रिम उतार तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे धानोरा बु. (ता.जिंतुर, जि.परभणी) येथे ज्या नाल्यावर बंधारा बांधला त्या नाल्याची नोंद गाव नकाशा किंवा गुगलमॅप मध्ये दिसत नसल्याने येथे चुकीच्या पध्दतीने साठवण तलावाच्या कामात अनियमितता होऊन बांधलेल्या बंधाऱ्याकरीता शासनाच्या निधीचा अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याकरीता येथील स्थानिक प्रतिनिधींची मागणी होत असून उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

(४) लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार सदर कामाची प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून चौकशी करण्यात आली आहे. दक्षता पथकाचा प्राथमिक चौकशी अहवाल दिनांक ३०/०६/२०२५ रोजी शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालाची छाननी शासनस्तरावर सुरु आहे. सदर अहवालाप्रमाणे संबंधीतांवर नियमोचित कारवाई करण्यात येईल.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१४) * २३३७ श्री.विक्रांत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ‘जल जीवन मिशन” योजनेंतर्गत सुरू असलेल्या १३१ कामांपैकी फक्त १७ कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे अपूर्ण असल्याने येथील आदिवासींना माहे डिसेंबर, २०२४ ते मे, २०२५ या सहा महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागले असून पिण्याच्या पाण्यासाठी त्यांना पाच-पाच मैलाचे अंतर असलेले डोंगर उतरून डोक्यावरून पाणी आणावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल तालुक्यातील ५१ ठिकाणच्या विहिरी आणि विंधण विहिरी खोदण्याचे काम सुरू असून आपटा ग्रामपंचायत हद्दीतील टोकाचीवाडी, सोनारवाडी, नेंरे, टेमघर येथे अजूनही विहीरीच्या कामाची सुरुवात झालेली नसून रिटघर येथील जुन्या विहीरीचे खोलीकरण न केल्यामुळे येथील ग्रामस्थांना अंघोळीस व कपडे धुण्यास पाणी उपलब्ध नसल्याने येथे आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल तालुक्यामध्ये माहे एप्रिल व मे महिन्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई होत असतानाही सदरच्या योजनेची कामे जलदगतीने पूर्ण करुन पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींना नियमितपणे उद्भवणाऱ्या पाणी समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बोनशेत-विहीवर पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत असून, सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. तर जिल्हा परिषद, रायगड मार्फत राबविण्यात येत असलेल्या १३३ योजनांपैकी ३७ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या आहेत. टंचाई काळात आवश्यक त्या ठिकाणी टॅंकरने पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(२) ग्रामपंचायत आपटा हददीतील सोनारवाडी येथील विहीरीचे काम पूर्ण झाले आहे. टोकाचीवाडी ग्रामस्थांकडून व लोकप्रतिनिधीकडून एम.आय.डी.सी. मुख्य जलवाहिनी स्त्रोत निश्चित करुन योजना सुधारीत करणेची तोंडी मागणी आहे. परंतु ग्रामसभा ठराव ग्रामपंचायतकडून अप्राप्त आहे. तसेच एम.आय.डी.सी. जलवाहीनी टॅपींग कनेक्शन मंजूर नाही. नेरे व टेमघर येथे विहीरीकरीता ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. रिटघर येथील विहीर खोलीकरणाकरीता स्थानिकस्तरावरुन ग्रामस्थांच्या हरकतीमुळे ठेकेदार मार्फत कामास सुरुवात करता आली नाही. इतर स्त्रोतावरुन पाणीपुरवठा सुरु आहे.

(३) आदिवासींसाठीच्या योजना मंजूर असून कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. काही उपागांकरीता जागा उपलब्ध होण्यास दिरंगाई अथवा अडचण निर्माण झाली तसेच काही ठिकाणी ठेकेदाराचा दिरंगाईमुळे कामे वेळेत पूर्ण न झाल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कारवाई करुन फेरनिविदाची कार्यवाही करण्यात येत आहे. माहे एप्रिल व मे महिन्यात पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे १० टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(४) ग्रामपंचायतीकडून विहीर, बोअरवेल, जलकुंभाकरीता जागा उपलब्ध तसेच काही योजनांकरीता एम.आय.डी.सी., सिडको, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य जलवाहिनीवरून टॅपिंग कनेक्शन तसेच रेल्वे, वनविभाग, अभयारण्य विभागाच्या परवानगी प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## जलसंपदा विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी-१ आणि उपविभागीय अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांचे मृद व जलसंधारण विभागात केलेल्या समावेशनाबाबत

**(१५) * ३५३० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी-१ आणि उपविभागीय अभियंता संवर्गातील काही अधिकाऱ्यांचे मृद व जलसंधारण विभागात चुकीच्या पध्दतीने, शासनाची दिशाभूल करून कायमस्वरूपी समावेशन करण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अधिकाऱ्यांनी सुरुवातीस शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीवर आक्षेप घेतल्यानंतर मा.न्यायालयीन स्तरावर ही बाब मांडण्यात आली असता मा.न्यायालयाने शासनाच्या अटी व शर्तीवरील आक्षेप अर्जाचा विचार करून निर्णय घेण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रालयातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खोट्या व दिशाभूल करणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे संबंधित अधिकाऱ्यांचे समावेशन करताना जलसंपदा विभागाची कोणतीही परवानगी, ना-हरकत प्रमाणपत्र अथवा कार्यमुक्त प्रमाणपत्र घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलसंपदा विभागाच्या ६ अधिकाऱ्यांचे विभागाच्या परवानगीशिवाय व आवश्यक कागदपत्रांशिवाय मृद व जलसंधारण विभागामध्ये समावेशन करण्यात आल्यामुळे इतर पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना समावेशन होताना वंचित रहावे लागले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पडताळणी करुन बेकायदेशीरपणे समावेशन केलेले अधिकारी व चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे माहिती सादर करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करुन पात्र अधिकाऱ्यांचे समावेशन करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

तथापि, मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक ३१/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील ८ (vi) मधील तरतुदीनुसार, जलसंपदा विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे समावेशन या विभागामध्ये करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) विभागाचा दिनांक ३०/११/२०२२ रोजीचा समावेशनाचा शासन निर्णय व त्याद्वारे समावेशन झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता निश्चित करणेबाबतचा दिनांक १५/०४/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाला मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे अनुक्रमे मूळ अर्ज क्र.८४२/२०२४ मूळ अर्ज क्र. ८९९/२०२४ अन्वये आव्हान देण्यात आलेले आहे. शासनाच्या वतीने मूळ अर्ज क्र.८४२/२०२४ व ८९९/२४ संदर्भात शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे. मा.न्यायाधिकरणाने सदर प्रकरणी याचिकाकर्ते यांना दिनांक २०/०८/२०२४ व दिनांक २३/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये अंतरिम दिलासा दिलेला नाही. सदर दोन्ही प्रकरणे अद्याप न्यायप्रविष्ट आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंगणवाडी स्तरावरील शालेय पोषण आहारामध्ये निकृष्ट धान्य पुरविणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याच्या निर्देशाबाबत

**(१६) * ३५७१ श्री.संजय केणेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी गावागावात अंगणवाडी सेविका प्रामाणिकपणे काम करीत असून त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची जबाबदारी घेऊन त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी असे निर्देश मा.पालकमंत्री, रत्नागिरी महोदयांनी जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे झालेल्या बैठकीत दिल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहारामध्ये ठेकेदारांनी जर निकृष्ट धान्य पुरविले असेल तर संपूर्ण रोष अंगणवाडी सेविकांवर येत असल्याने निकृष्ट धान्य पुरविणाऱ्या ठेकेदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे निर्देशही मा.पालकमंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.पालकमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी, मा.पालकमंत्री, रत्नागिरी यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत संघटना प्रतिनिधी आणि अधिकारी यांच्यासोबत विविध विषयासंदर्भात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत पोषण आहारासंदर्भात चर्चा करताना अंगणवाडीतील लाभार्थ्यांना शासनाकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या पोषण आहाराबाबत (THR) पालकांच्या तक्रारी येत असल्याने अंगणवाडी सेविकांना पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. ही बाब गंभीर असून, यापुढे जर निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा झाल्यास संबंधित ठेकेदारांवर गुन्हा दाखल करावा असे निर्देश पालकमंत्री यांनी दिले आहेत.

(३) संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून पोषण आहार पुरवठ्याचा आढावा घेतला आहे. जिल्ह्यामध्ये सर्व ठिकाणी पोषण आहार पुरवठा चांगल्या प्रतीचा होत असल्याची त्यांनी खात्री केली आहे. तसेच, सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना त्यांच्या अधिनस्त अंगणवाडी सेविका व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत:-• अंगणवाडी स्तरावर शासनाकडून पुरवठा करण्यात येणारा पोषण आहार (THR) चांगला व उत्कृष्ट दर्जाचा असल्याची खात्री करूनच तो स्वीकारला जावा.

• जेव्हा THR प्राप्त होईल, तेव्हा त्याची खात्री करावी आणि तो निकृष्ट दर्जाचा असल्यास अंगणवाडी स्तरावर स्वीकारला जाऊ नये.

त्याचप्रमाणे एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालय यांचे स्तरावरून घरपोच आहाराच्या सर्व पुरवठादारांना आहार तयार करताना योग्य ती काळजी घेण्याबाबत आणि चांगल्या प्रतीचा आहार विहित कालावधीत अंगणवाडी स्तरावर पोहोचवण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथील रॅगिंग प्रकरणे रोखण्याबाबत

**(१७) * ३६७७ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठात मागील २ ते ३ वर्षापासून सर्वाधिक ६१ रँगिंगच्या तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, या विद्यापीठात विद्यार्थ्यांवर होत असलेल्या रॅगिंगमुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली असून काही विद्यार्थी त्यांचे शिक्षण सोडून गेल्यामुळे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले असल्याची बाब सोसायटी अग्रेन्स्ट व्हायोलन्स इन एज्युकेशन (सेव्ह) या संस्थेच्या अहवालातून नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठात विद्यार्थ्यांवर होत असलेल्या रॅगिंगमुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली असून काही विद्यार्थी त्यांचे शिक्षण सोडून गेल्यामुळे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याप्रकरणी, रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांविरुध्द व दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच रॅगिंगची प्रकरणे रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०२२ ते सन २०२४ पर्यंत नॅशनल ॲन्टी रॅगींग पोर्टलच्या माध्यमातून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे ५० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर प्राप्त ५० तक्रारींची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने तात्काळ दखल घेतलेली आहे.

परंतु अशा प्रकरणांमुळे विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य बिघडून शैक्षणिक नुकसान होणे व आत्महत्येचे प्रमाण वाढण्याबाबत घटना निदर्शनास नाहीत.

सोसायटी अग्रेन्स्ट व्हायोलेन्स इन एज्युकेशन (सेव्ह) या संस्थेच्या महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ रॅगिंगच्या तक्रारींबाबतचा अहवाल शासनाकडे उपलब्ध नाही.

(२) व (३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये कुठल्याही विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला नाही. विद्यापीठामार्फत सदर तक्रारींचे वर्गीकरण केले असता, त्यापैकी ०९ गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असून ४१ सामान्य स्वरुपाच्या तक्रारी आहेत.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी रॅगिंग विषयी उपाययोजना करण्यासाठी National Medical Commission (Prevention & Prohibition of Ragging in Medical Colleges & Institutions) Regulations, २०२१ प्रसिध्द केले आहेत. सदर नियमांनुसार राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता स्तरावर स्वतंत्र अँटी रॅगिंग समितीची स्थापना करण्यात आली असून, सदर समिती वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत आढावा घेत असते. तसेच अधिष्ठाता स्तरावर गठीत ॲटी रॅगिंग समितीने महाविद्यालयात होणारे रॅगिंग रोखण्यासाठी वेळोवेळी उपाययोजना करणेबाबत संचालनालयामार्फत सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यात कर्करोगाचे निदान करण्यासाठी खरेदी केलेल्या तपासणी वाहन खरेदीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * ३८२० श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्करोगाचे निदान करण्याकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाने ८ कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन बाजारभावापेक्षा दुप्पट-तिप्पट दराने सर्व नियमांचे उल्लंघन करून खरेदी केली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदीत ८ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून वाहन खरेदी दराबाबत अभिप्राय न घेता शासनाची फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वाहन खरेदीच्या प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

०८ कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन ची खरेदी हि GeM पोर्टलवर Turn Key पध्दतीने करण्यात आलेली असून, स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त दर हे एकूण अंदाजित दरापेक्षा ०.९४ टक्के ने कमी आहेत.

(२) हे खरे नाही.

०८ कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन ची खरेदी हि GeM पोर्टलवर स्पर्धात्मक पध्दतीने करण्यात आलेली असून बस चासिस, ४४ नग वैद्यकीय उपकरणे, फर्निचर व कस्टमायझेशन इतर चा समावेश आहे. सदर खरेदी हि शासनाचे सर्व प्रचलित नियमांचे पालन करून करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक शुश्रुषागृहांकडून नियमांचे पालन होत नसल्याने कारवाई करणेबाबत

**(१९) * ४२६० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागाने जिल्हास्तरावर तपासणी पथके तयार करुन विविध जिल्ह्यातील शुश्रुषागृहांची तपासणी केली असता त्यात सुमारे २ हजार ९३६ शुश्रुषागृह चालकांनी शासनाने आखून दिलेल्या नियमांचे पालन न केल्यामुळे शुश्रुषागृह चालकांवर कारवाई करण्याबाबत नोटीसा बजाविण्यात आल्या असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोटीसांच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या शुश्रुषागृह चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम २०२१ अंतर्गत दिलेल्या सुचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन होते किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी महाराष्ट्रात धडक मोहिम घेण्यात आली असून त्याअंतर्गत २३,३५४ रूग्णालयांची तपासणी जिल्हास्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असून त्यापैकी ४८०७ रूग्णालयांना दर पत्रक न लावणे किंवा इतर त्रुटीबद्दल एका महिन्यात सुधारणा करण्यासंदर्भात नोटीस देण्यात आली. त्यानंतर त्या रूग्णालयांची पुर्नतपासणी करण्यात येत आहे. दिनांक २७/०६/२०२५ पर्यंत १३६४ रूग्णालयांची पुर्नपडताळणी करण्यात आली असून, उर्वरीत रूग्णालयांची पुर्नतपासणी क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.

(२) वरीलप्रमाणे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(२०) * ४३९९ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील घरकुलाचे स्वप्न साकारणाऱ्या पंतप्रधान आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत राज्यातील १९.६६ लाख घरकुलांचे उद्दीष्ट देण्यात आलेले असून माहे जानेवारी, २०२५ अखेर पर्यंत केवळ १६.८१ लाख घरकुलांनाच मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील घरकुलांच्या कामांना गती देण्याच्या सुचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे फेब्रवारी, २०२५ मध्ये संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिल्या असून उक्त योजनेंतर्गत घरकुलांचे उद्दीष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे आहे.
(२) मा.मुख्यमंत्री महोदयांनी १०० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत देण्यात आलेल्या सुचनांच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे:-

१. किमान १३ लाख घरकुलांना मंजूरी देणेचे उद्दिष्ट दिले होते तथापि, १३,६०,०८४ (१०४.६%) घरकुलांना मंजूरी देण्यात आली.

२. किमान १ लाख घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्याचे उद्दिष्ट दिले होते तथापि १,४८,५४२ (१४८.५%) घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण केली.

३. विविध योजनांच्या माध्यमातून किमान ५००० लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट होते पण २३,३३३ (४६६.७%) भूमीहीन लाभार्थ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली.

४. दिनांक १ जानेवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यामध्ये १ जानेवारी, २०२५ ते १० एप्रिल, २०२५ या कालावधीत १० उपक्रमांचा समावेश असलेले महा आवास अभियान राबविण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंढेगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीला लागलेल्या आगीच्या घटनेस जबाबदार कंपनी व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२१)** * **४४०६ श्री.सुनिल शिंदे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंढेगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीला लागलेल्या आगीत कंपनीतील १६ पैकी ८ प्रकल्प पूर्णपणे जळालेले असून नव्वद टक्के उत्पादन विभाग हे या आगीत नष्ट झाले असल्याची घटना दिनांक २२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू भीषण आगीची तीव्रता वाढत गेल्याने प्रशासनाने सभोवतालच्या तीन कि.मी. परिसरासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करतानाच एक कि.मी. परिसरातील पाच गावे रिकामी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आगीचे नेमके कारण काय होते तसेच संबंधित कंपनीने अग्निप्रतिरोधक यंत्रणा कार्यान्वित केल्या होत्या काय व सदर यंत्रणेची तपासणी यापूर्वी केव्हा करण्यात आली होती काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू घटनेस जबाबदार असणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्यासह बाधित गावकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी व औद्योगिक सुरक्षेच्या दृष्टीकोणातून शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

जेपीएफएल फिल्म्स प्रायव्हेट लिमिटेड मुंढेगाव, ता.इगतपुरी, जि.नाशिक या कारखान्यात दिनांक २१/०५/२०२५ रोजी मेटालायझर प्लान्टच्या बाहेरील बाजुस ठेवलेल्या स्क्रॅपमध्ये शॉर्टसर्कीटमुळे अचानक आग लागून कारखान्यात आग पसरली.

सदर आगीमध्ये कारखान्यातील २६ प्रोडक्शन लाईनपैकी २२ प्रोडक्शन लाईनचे नुकसान झाले असून जवळपास ८० ते ८५ % कारखान्याचे नुकसान झाले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

उप विभागीय अधिकारी, इगतपुरी यांच्या दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये तीन कि.मी. परिसरासाठी जमावबंदी लागू करण्यात आली होती.

तथापि, एक कि.मी. परिसरातील पाच गावे रिकामी केली नसल्याचे तहसिलदार, इगतपुरी यांनी कळविले आहे.

(३) सदर कारखान्यात दिनांक २१/०५/२०२५ रोजी मेटालायझर प्लँटच्या स्क्रॅपमध्ये शॉर्टसर्कीटमुळे आग लागून कारखान्यात इतरत्र पसरली.

सदर कंपनीत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून सदर यंत्रणेची महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाकडून दिनांक १७/०४/२०२३ रोजी तपासणी करण्यात आली होती. कंपनीस अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला दिनांक २२/०४/२०२३ रोजी देण्यात आल्याचे संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी कळविले आहे.

(४) सदर घटनेच्या अनुषंगाने कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, संचालनालयाकडून चौकशी करण्यात आलेली असून कायदेभंगासाठी कारखान्याचे भोगवटादाराविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कारखान्यास उपाययोजना सुचविण्यांत आलेल्या आहेत.

सदर घटनेमध्ये परिसरातील गावे बाधित झाली नसल्याचे तहसिलदार, इगतपुरी यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साकुर, घुलेवाडी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * ४४७१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकुर, घुलेवाडी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर व कर्मचारी तसेच औषधे व उपकरणे यांची कमतरता असल्यामुळे येथे येणाऱ्या रुग्णांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साकुर रुग्णालयासाठी स्वतंत्र इमारतीचे काम अद्याप प्रलंबित असून सध्या साकुर या रुग्णालयात फक्त १५ खाटांचीच सुविधा असून मोठ्या प्रमाणात येणाऱ्या रुग्णसंख्येच्या तुलनेत ही व्यवस्था अपुरी असल्यामुळे नागरिकांची उपचारासाठी मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समस्यांच्या पार्श्वभूमीवर शासनाने चौकशी केली आहे काय व या रुग्णालयात सुविधा वाढवण्यासाठी आणि नागरिकांना योग्य आरोग्यसेवा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१), (२) व (३)

ग्रामीण रुग्णालय, साकुर व ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर या दोन्ही ठिकाणी ३० खाटांची ग्रामीण रुग्णालये पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहेत. तेथील अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरण्यात आली असून औषधांचा साठा व उपकरणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

तसेच शासन निर्णय दिनांक १३/०८/२०२१ अन्वये घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन झाले असून रुग्णालयाचे बांधकाम सद्य:स्थितीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वडद (ता.जि.अमरावती) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावित इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * २९६४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्याला संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालय उभारणीसाठी मौजे आलियाबाद कोंडेश्वर वडप येथील ११.२९ हेक्टर एकर जागा मंजूर होऊन एक वर्ष इतका कालावधी पूर्ण होऊनही या जागेवर प्रत्यक्षात वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम झाले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू झाले असून प्रथम वर्षाकरीता १०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे व आता द्वितीय वर्षाची तयारीदेखील वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाने सुरू केली असताना मेडिकल कॉलेजच्या इमारतीचे बांधकाम सुरु न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरीता निवडण्यात आलेली जागा ही शहरापासून १० किलोमीटर अंतरावर असून वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयासाठी निवड केलेल्या जागेवर रुग्णालय बांधल्यास मेळघाट व इतर तालुक्यातून येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना अमरावती शहराला वळसा घालुन यावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयाच्या जागेत बदल करून बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय

(२) सदर संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालय इमारतीच्या बांधकामाकरीता केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली असून आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सोबत सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर बांधकामासाठी कंत्राटदार नियुक्त करण्याकरीता आशियाई विकास बँकेच्या (ADB) मानकानुसार निविदा राबविण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) होय

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## खवसावाडी (ता.पेण, जि.रायगड) येथील आदिवासी महिलेचा रस्त्याअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(२४) * २६६७ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खवसावाडी (बोरगाव) (ता.पेण, जि.रायगड) येथील आदिवासी वाडी व परिसरातील वाड्यांत रस्त्यांच्या कामासाठी कोटयवधी रुपयांचा निधी उपलब्ध करुनही प्रत्यक्षात मात्र रस्ते तयार न झाल्याने सदर वाडीतील श्रीमती आंबी राध्या कडू ह्या ४२ वर्षीय आदिवासी महिलेचा रस्त्याअभावी दुर्देवी मुत्यू झाल्याची बाब माहे मार्च, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खवसावाडी (बोरगाव) येथील आदिवासी वाडीतील कागदोपत्री रस्ते बनविणाऱ्या बोगस ठेकेदार व संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत तसेच राज्यातील तांडे/वाडी आणि वस्तींच्या रस्त्याचा मास्टर प्लॅन बनवून वर्षभरात सर्वच वाडी, वस्ती व तांडे रस्त्याना जोडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) खवसावाडी (ता.पेण, जि.रायगड) येथील आदिवासी महिला श्रीमती आंबी राध्या कडू, वय-४२ या दमा व खोकला या वरील उपचारासाठी दिनांक ०६/११/२०२४ रोजी जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथे दाखल झाल्या होत्या. श्रीमती कडू यांचा रुग्णालयातच दिनांक ०८/११/२०२४ रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना भाग-२ अंतर्गत २.३ कि.मी. लांबीचे पेण ते खवसा उंबरवाडी तांबडी रस्ता, (DPC-RAI-DCP-(II)-०२) ता.पेण हे काम मंजूर असून सदर कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये २१०.०८ लक्ष आहे. सदर कामाचा ठेका मे. सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन, वाशी यांना दिनांक २५/०१/२०२४ रोजी देण्यात आला आहे.

तथापि, सदर रस्त्यामधील खाजगी व वन विभागाच्या जागेच्या अडचणीमुळे काम सुरवात करण्यास विलंब झाला आहे. सदर कामास वनविभागाची दिनांक २७/०५/२०२५ रोजी परवानगी प्राप्त झाली आहे. सध्यस्थितीत खाजगी व वनविभागाच्या जागेतून रस्ता बांधणेचे काम हाती घेण्यात आले असून काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

-----------------

## खेड (ता.जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीमधील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई करणेबाबत

**(२५)** * **३५३९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.सातारा) ग्रामपंचायतीचे तत्कालिन ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत हद्दीतील गोकर्णनगर बंदिस्त गटाराच्या कामाची वर्क ऑर्डर व ग्रामपंचायतीमधील ठराव या दोन्हीवर बनावट सह्या करुन जवळपास १६ लाख ७९ हजार १४३ इतक्या रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करुन गुन्हे दाखल करण्याचे आदेश गटविकास अधिकारी यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास देऊन चार महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्याप कोणतही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी सरपंच, उपसरपंच व तत्कालिन ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३)

१. खेड (ता.सातारा) ग्रामपंचायतीमध्ये गोकर्णनगरमध्ये ग्राम निधीतून मंजूर बंदीस्त गटाराच्या कामाची वर्क ऑर्डर आणि मासिक सभा ठराव यावर तत्कालिन ग्रामविकास अधिकारी यांच्या सह्या विसंगत असल्याची तक्रार गट विकास अधिकारी, पं.स.सातारा यांच्याकडे प्राप्त झाली. त्यास अनुसरुन विस्तार अधिकारी (पं) यांनी दिनांक ०३/०७/२०२४ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार सदर कामाची वर्क ऑर्डर व ठरावावरील सह्यांमध्ये भिन्नता असल्याची बाब निदर्शनास आली आहे. या अनुषंगाने गट विकास अधिकारी,पं.स.,सातारा यांनी सदर कामाच्या वर्क ऑर्डर व ठरावावरील सह्याबाबत जबाबदार यांच्यावर गुन्हा दाखल करावा असे पत्र दिनांक १७/१२/२०२४ रोजी सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत खेड यांना दिले आहे. त्यानुसार ग्रामपंचायत अधिकारी यांनी २७/०१/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक, सातारा शहर पोलीस स्टेशन यांना बनावट सह्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे पत्र दिले आहे. तसेच या प्रकरणी सरपंच आणि तीन ग्रामपंचायत सदस्य यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९ (१) प्रमाणे कार्यवाहीची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सातारा यांनी केली असून विभागीय आयुक्त, पुणे यांच्यास्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

२. उक्त नमूद गोकर्णनगर येथील बंदिस्त गटाराच्या कामाव्यतिरिक्त ग्रामपंचायत खेड (ता.सातारा) अंतर्गत एकूण १२ कामांमध्ये रुपये १६,७९,१४३/- ची अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने संबंधित ग्रामपंचायत अधिकारी व संबंधित सरपंच यांचेकडून सदर रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

तथापि, सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांच्या दिनांक २७/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जावळी यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त चौकशी समिती नेमली आहे. सदर समितीस दिनांक १०/०७/२०२५ पर्यंत अहवाल सादर करण्यास मुदत दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पश्चिम महाराष्ट्रामध्ये औद्योगिक हब उभारण्याबाबत

**(२६)** * **४५१० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाडा- विदर्भाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात चांगले रस्ते, वीज, पाणी आणि दळणवळणाची व्यवस्था इ.मुळे उद्योगांसाठी अनुकूल वातावरण असतानाही उद्योजकांना समान सेवा-सुविधा मिळत नसल्याने विदर्भ-मराठवाड्या सारखे औद्योगिक हब येथे उभे राहिले नसल्याने येथील उद्योजक पिछाडीवर गेला असल्याचे माहे जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ६४ वर्षाच्या कालावधीत राज्यात ठिकठिकाणी विशेषतः विदर्भात मिहानसारखे मोठे प्रकल्प उभारण्यात आले असून त्याप्रमाणात पश्चिम महाराष्ट्रात मोठे उद्योग उभे राहिले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना मराठवाडा- विदर्भाप्रमाणे समान सेवा- सुविधा उपलब्ध करून उद्योजक सक्षम करण्याकरीता व मिहान सारखे मोठे प्रकल्प उभारण्याकरीता शासन कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) म.औ.वि. महामंडळाच्या पुणे विभागांतर्गत पुणे-१, पुणे-२, बारामती, सातारा, कोल्हापुर, सांगली व सोलापूर अशी एकूण ७ प्रादेशिक कार्यालय कार्यरत आहेत.

पुणे विभागातंर्गत १७१०४ हेक्टर क्षेत्रावर एकूण ६८ औद्योगिक क्षेत्रे असून एकूण आरेखित भूखंडाची संख्या १७५५० असून त्यांचे क्षेत्र ११२४२ हे. आर इतके आहे. त्यापैकी १५५९७ भुखंड वाटप करण्यात आले आहेत. पुणे विभागामध्ये हिंजेवाडी येथे IT Park, तळेगांव, चाकण येथे Automotive Sector, तळेगांव येथे Floriculture Park कोल्हापुर येथे Textile Zone, Silver Zone ई. विकसित करण्यात आलेले आहे.

पुणे जिल्हा अंतर्गत औद्योगिक क्षेत्रामध्ये M/s. Skoda Auto Volks Wagan India Pvt. Ltd., M/s. Bajaj Auto Ltd., M/s Mercedez Benz Pvt. Ltd, M/s, Mahindra Vehicle Manufacturing Ltd.. M/s Infosys Ltd. M/s Wipro M/s Tata Consultancy Service Ltd. M/S Tata Motors M/S LG Electronics Pvt Ltd. M/s Bharat Forge Ltd, M/s Piaggio Vehicles pvt ltd, M/s Bauli India Bakes & Sweets Pvt ltd, इत्यादी कंपनीना जागेचे वाटप करण्यात आलेले आहे.

सांगली जिल्हा अंतर्गत औद्योगिक क्षेत्रामध्ये M/S. Kanhayya Agro, M/S. Grand Western Pvt Ltd. M/S. GGEPIPL च Pagnism Innovation Pvt Ltd इत्यादी कंपनीना जागेचे वाटप करण्यात आलेले आहे.

कोल्हापूर जिल्हा अंतर्गत औद्योगिक क्षेत्रामध्ये M/s. Kolhapur Dudh Sangh Ltd, M/s. Kirloskar Oil Engine Ltd, M/s. Sound Casting Pvt Ltd, M/S. INDO COUNT INDUSTRIES LTD इत्यादी कंपनीना जागेचे वाटप करण्यात आलेले आहे.

सातारा जिल्हा अंतर्गत औद्योगिक क्षेत्रामध्ये M/S.Garware Fulflex Pvt.Ltd., M/s.Sona Alloys Pvt.Ltd., M/s. Cummins India Ltd., M/S. ASIAN PAINTS LIMITED, M/s. Nipro India Pvt Ltd, M/s. Dat Waylar इत्यादी कंपनीना जागेचे वाटप करण्यात आलेले आहे.

सोलापूर जिल्हा अंतर्गत औद्योगिक क्षेत्रामध्ये M/s. Balaji Amines Ltd., M/s Glenmark Life Science Ltd., M/s Walwhan Ltd., M/s Khandoba Distilleries Ltd., M/s Jindal Fitting Ltd. इत्यादी कंपनीना जागेचे वाटप करण्यात आलेले आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र शैक्षणिक संस्था प्रवेश शुल्क (कॅपिटेशन फी बंदी) कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(२७) * २५०१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय महाविद्यालयांमध्ये सरासरी ५० हजार शुल्कात वैद्यकीय शिक्षण मिळत असताना खाजगी महाविद्यालयांची फी १५ ते ३० लाख रुपये असल्याने खाजगी महाविद्यालयातील वैद्यकीय शिक्षणाचा एकूण खर्च १ कोटी रुपयांवर गेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू खाजगी वैद्यकीय शिक्षणाच्या शुल्कवाढीवर अंकुश लावण्यात यावा तसेच शासनाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था प्रवेश शुल्क (कॅपिटेशन फी बंदी) कायदा १९८७ ची कठोर अंमलबजावणी करत खाजगी महाविद्यालयांचे शुल्क किमान ५० टक्क्यांनी कमी करावे अशी मागणी संसदीय स्थायी समितीने (आरोग्य आणि कुटुंब कल्याण) केली असून सदर शुल्क किमान ५० टक्क्यांनी कमी केल्यास वर्षाला ८ लाख रुपयांचे उत्पन्न असलेल्या कुटुंबांनादेखील वैद्यकीय शिक्षण घेणे सोईचे होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार खाजगी महाविद्यालयांचे शुल्क किमान ५० टक्क्यांनी कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशतः खरे आहे.

सद्य:स्थितीनुसार राज्यात वैद्यकीय शिक्षणासाठी विविध महाविद्यालयात येणारा खर्च खालीलप्रमाणे आहे:-

- शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये:- रुपये १,३८,०००/-(प्रतिवर्ष)

• खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये:- रुपये ८.०० लाख ते १७.०० लाख (प्रतिवर्ष)

• अभिमत विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालये:- रुपये १८.५० लाख ते २५.०० लाख (प्रतिवर्ष)

यानुसार अभिमत विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय शिक्षणाचा खर्च साधारण रुपये १.०० कोटीपर्यंत जात असल्याचे निर्दशनास येत आहे.

(२) हे खरे नाही,

सध्या राज्यातील विविध शासकीय शिष्यवृत्ती योजनांतर्गत शासकीय, महानगरपालिका आणि खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयात कॅप प्रवेश फेरीद्वारे प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे एकूण उत्पन्न रुपये ८.०० लक्ष व त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना शासनस्तरावरुन खालीलप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येते.

• खुला/ईडब्ल्यूएस - मुले ५० टक्के / मुली १०० टक्के

• ओबीसी - मुले ५० टक्के / मुली १०० टक्के

• एससी, एसटी, एनटी, व्हीजेएनटी- मुले १०० टक्के / मुली १०० टक्के

याव्यतिरिक्त राज्यातील अभिमत विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लक्ष व त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना मा.न्या. श्री.एम.एन. गिलानी (निवृत्त) तथा माजी अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या शिफारशीनुसार, विद्यार्थी संख्या भारित सरासरी (Weighted Average) या सुत्रानुसार शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटी रुग्णालय (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी विद्यार्थ्यांकरीता अद्ययावत वसतिगृह उभारण्याबाबत

**(२८)** * **२४२७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटी रुग्णालय (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता निवासासाठी असलेल्या वसतिगृहाच्या इमारती या ६० वर्षापूर्वीच्या असून सदर इमारतीचा चाळीस फुटाचा बीम पडून छत कोसळल्याची घटना घडली, परंतु सदर वसतिगृह बंद असल्यामुळे येथे कोणतीही जिवितहानी झाली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घाटी परिसरात पदवी पूर्व, पदव्युत्तर, अंतरवासिका व परिचर्याचे एकूण २१०० विद्यार्थी राहत असून जुनी इमारत, ड्रेनेजची समस्या, इमारत गळतीचे प्रमाण यामुळे विद्यार्थी त्रस्त असून घाटी महाविद्यालय अंतर्गत असलेल्या शासकीय परिचर्या महाविद्यालयास स्वत:ची इमारत नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात नॅफ्रालाजी इमारतीत वर्ग भरविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी वसतिगृहासाठी घाटी परिसरात मुबलक जागा उपलब्ध असल्यामुळे येथे मोठी इमारत बांधणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घाटी वैद्यकीय महाविद्यालयातील विविध शाखेचे शिक्षण घेत असलेल्या २१०० विद्यार्थ्यांसाठी नवीन अद्ययावत इमारत व निवासासाठी नविन इमारती बांधकाम करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, खरे आहे.
(२) विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील ड्रेनेज व इतर समस्यांबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्त्या व किरकोळ कामे करुन घेतली जातात. परिचर्या महाविद्यालयाची धोकादायक इमारत ५० वर्षापेक्षा जुनी झाल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाडण्यात आली असल्याने सद्य:स्थितीत परिचर्या विद्यार्थ्यांचे वर्ग संस्थेच्या नेफ्रोलॉजी इमारतीत भरविण्यात येत आहेत.
(३) होय.
(४) सदर संस्थेस पदवीपूर्व, पदव्युत्तर, आंतरवासिता व पीबीएमटी इत्यादी विद्यार्थ्यांकरीता नवीन अद्ययावत वसतिगृहे इमारत बांधकामाकरीता खर्चाचे अंदाजपत्रके व नकाशे तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील संजीवनी अभियानाची व्याप्ती वाढवून महिलांकरीता स्वतंत्र कर्करोग रुग्णालय स्थापन करण्याबाबत

**(२९) * २३९५ श्री.विक्रांत पाटील, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात आलेल्या "संजीवनी अभियान" अंतर्गत महिलांमध्ये तोंडाचा कर्करोग, गर्भक्षयाचा कर्करोग व स्तनांचा कर्करोग हे आजार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभियानांमार्फत दिनांक ८ ते २७ मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान राबविण्यात आलेल्या सर्व्हेमध्ये एकट्या हिंगोली जिल्ह्यात ३ लाखांहून अधिक महिलांची माहिती गोळा केल्यानंतर त्यातील १३ हजार ९५६ महिला कर्करोग संशयित आढळल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संशयित कर्करोग महिलांचे स्क्रिनिंग करण्यात आले आहे काय, असल्यास त्यात किती महिला कर्करोगग्रस्त असल्याचे आढळून आले आहे,
(४) असल्यास, दिवसेंदिवस महिलांमध्ये वाढत्या कर्करोगाचे प्रमाण पाहता राज्यातील फक्त महिलांसाठी स्वतंत्र "कर्करोग रुग्णालय" उभारण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

हिंगोली जिल्ह्यामध्ये ८ मार्च ते २७ मार्च २०२५ या कालावधीमध्ये पूर्ण सर्वेक्षण झाल्यानंतर महिलांमध्ये आढळलेल्या लक्षणाच्या अनुषंगाने वैद्यकिय अधिकारी यांच्या मार्फत तपासणी केल्यानंतर संशयित महिलांचे कर्करोग बाबत विश्लेषण केले - असता गर्भाशय मुख कर्करोग संशयित एकूण ७९११, स्तन कर्करोग संशयित एकूण २६९८ तसेच मुख कर्करोग संशयित स्त्री-पुरुष मिळून एकूण २९३३ याप्रमाणे असे एकूण १४५४२ संशयित रुग्ण निदर्शनास आले आहेत.

(३) संशयित कर्करोग महिलांची स्क्रिनिंग करण्यात आलेले असून कर्करोग आढळून आलेल्या महिलांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१. गर्भाशयमुख कर्करोग -३,

२. स्तन कर्करोग -१

३. मौखिक कर्करोग-२

(४) सद्य:स्थितीत महिलांसाठी स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित नाही. तथापि, कर्करोग रुग्णासाठी खालीलप्रमाणे उपचार व आरोग्य सेवा उपलब्ध आहेत-

१. राज्यातील कर्करोगाचे रुग्णांना सुविधा देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रतिबंधात्मक उपचार, निदान, आणि संदर्भ आरोग्य सेवा उपचार देण्यात येतात. कर्करोग आजाराने बाधित रुग्णांना राज्यातील शासकीय कर्करोग रुग्णालयामार्फत आणि महात्मा ज्योतिराव फुले योजनेमार्फत संलग्नीत रुग्णालयात उपचार दिले जात आहेत.

२. महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर सेवा- महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर (MCW) हे टाटा मेमोरियल सेंटर अंतर्गत शिक्षण घेतलेले कर्करोग तज्ञ आहेत. या उपक्रमांतर्गत Tata Memorial Hospital (TMH) संबंधित कर्करोग तज्ञ हे महिन्यातून दोनदा जिल्हा रुग्णालयांना भेट देतात आणि संबंधित रुग्णालय स्तरावर उपलब्ध पायाभूत सुविधांवर अवलंबून कर्करोग OPD आणि IPD सेवा प्रदान करतात. राज्यातील ११ जिल्हयांमध्ये (पुणे, सातारा, सांगली, रायगड, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, ठाणे, 'नाशिक, अमरावती, बीड, जळगाव) ९ कॅन्सर वॉरियर्स कार्यरत आहेत.

३. डे केअर केमोथेरपी टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या तांत्रिक सहकार्याने राज्यातील ८ जिल्ह्यात (नाशिक, अमरावती, गडचिरोली, सातारा, रत्नागिरी, चंद्रपूर, पुणे, सिंधुदुर्ग) डे केअर किमोथेरपी आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील अनेक गावपाड्यांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(३०)** * **४३४३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात भातसासारखे मोठे धरण असतानाही येथील अनेक गावपाड्यांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली असून गावपाड्यांमध्ये टँकरद्वारे पुरविण्यात येणारे पाणी पिण्यायोग्य नसून या पाण्यातून दुर्गंधी येत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यात भातसा धरण परिसरातील गावपाड्यांत सुमारे १० हजारांच्या आसपास लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात पाण्याच्या टाक्या, घराबाहेर नळ जोडलेले असून त्या टाक्यांमधून जिल्ह्याबाहेरील भावली धरणातील पाणी दिले जाणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुक्यात भातसा धरण असताना बाजुच्या जिल्हयांतील भावली धरणातील पाणी देण्यामागची कारणे काय आहे तसेच शहापूर तालुक्यात भातसा धरण परिसरातील गावपाड्यात पाणी टंचाई व शुध्द पाणी मिळण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहापुर तालुका हा आदिवासी बहुल आहे. या तालुक्यातील राहणारी लोकसंख्या ही डोंगरी उंचभागावर रहाते व भातसा सारख्या मोठ्या धरणाचा पाणीसाठा हा खोलगट भागात असल्याने सदर पाणीसाठा उंचावर चढवण्यासाठी विद्युत पंपाव्दारे स्टेज पंपींग करणे अत्यंत खर्चिक व देखभाल दुरुस्तीच्या दृष्टीने परवडणारा नाही. सदर परिसराची भुस्तरी रचना दख्खन पठाराचा भाग व बेसॉल्ट या कठिण खडकांचा भाग असल्याने सदर भुजल स्तरांची घट ही उन्हाळ्यात अतिशीघ्र होते परिणामी भुजलावर आधारित असलेले उद्भव उदा. विहीरी व विंधन विहीर हे हंगामी स्वरुपाचे आहेत.

शहापूर तालुक्यामधील टंचाई विचारात घेऊन माहे फेब्रुवारी ते जुन या कालावधीमध्ये ३७ गांवे व १३४ पाडे असे एकूण १७१ गांव/पाड्यांना ४४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला आहे. तसेच टँकरद्वारे पुरविण्यात येणारे पाणी हे सापगांव नदीवरुन घेण्यात आले आहे. सदरच्या पाण्याची तांत्रिक चाचणी घेऊन पाणी पिण्यायोग्य असल्याने पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त ९७ गावे व २५९ वाड्यांचा समावेश असलेल्या व गुरुत्वाकर्षणावर आधारित भावली धरण हा शाश्वत उद्भव घेऊन एक प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. ग्रामस्तरावरील साठवण टाक्या व वितरण वाहिन्या ही कामे जिल्हा परिषद ठाणे मार्फत करण्यात येत आहेत.

शहापूर तालुक्यातील ९७ गावे व २५९ वाड्या हा भाग दुर्गम असून उंचावर असल्याने तेथून शहापूर तालुक्यातील गावांकरीता पंपिंग न करता गुरुत्वाकर्षणाद्वारे पाणी पोहचण्यास आवश्यक हेड उपलब्ध होत आहे, त्यामुळे सदर योजना गुरुत्वाकर्षणावर आधारित असल्यामुळे योजनेमध्ये विद्युत देयकांसाठीचा खर्च कमी होणार आहे. तसेच योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या खर्चात देखील बचत होणार आहे.

या योजनेचे कार्यारंभ आदेश दिनांक ०४/०८/२०२२ रोजी देण्यात आले आहेत. तसेच सद्य:स्थितीत योजनेची भौतिक प्रगती ७०% झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उपजिल्हा रुग्णालय, शहापूर (जि.ठाणे) येथे वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३१)** * **४५१९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपजिल्हा रुग्णालय, शहापूर (जि.ठाणे) येथे एका आठवड्यात सर्पदंशामुळे तीन तरुणांचा मृत्यू झाला असल्याची तसेच सदरहू उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांची आरोग्यविषयक गैरसोय होत असल्याची बाब दिनांक १२ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच उक्त दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

दोन सर्पदंशाच्या रूग्णांचा मे आणि जून, २०२५ मध्ये मृत्यू झाला. मात्र त्यापैकी एका रूग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला व एका रुग्णास जिल्हा रुग्णालयात संदर्भित करताना वाटेतच मृत्यू झाला. मात्र उपचाराअभावी अथवा सुविधा अभावी त्यांचे मृत्यू झालेले नाहीत. ह्या रूग्णालयामध्ये आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध आहेत.

(२) उपजिल्हा रुग्णालयात सर्पदंशावरील उपचारासाठी वैद्यकिय अधिकारी, अधिपरिचारीका, आवश्यक ते मनुष्यबळ, तसेच ASV व इतर अत्यावश्यक औषधांचा साठा उपलब्ध करुन देण्यांत आलेला आहे. अतिदक्षता विभागासाठी आवश्यक ते विशेषज्ञ भिषक, भुलतज्ञ, व मनुष्यबळ, यंत्रसामुग्री-साधनसामुग्री, औषधसाठा उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर जिल्हयांमधील अवैधरित्या गर्भलिंग निदान करणाऱ्या केंद्रांवर कारवाई करणेबाबत

**(३२)** * **४१७५ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग निदान तंत्र कायद्यातंर्गत तसेच बेटी बचाओ, बेटी पढाओ कार्यक्रमांतर्गत गर्भलिंग निदान करणे कायद्याने गुन्हा असतानाही राज्यातील बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यात सन २०२३ व २०२४ मध्ये अवैध गर्भलिंग निदान करुन गर्भपात होत असल्याने घटना निदर्शनास आल्या असून याचा परिणाम मुलींच्या जन्मदारावर होत असल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदान तंत्र कायद्याची (पीसीपीएनडीटी) प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दर तीन महिन्यांनी नियमितपणे सर्व सोनोग्राफी केंद्राची तपासणी करावी, तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व कागदपत्रे, अहवाल, दैनंदिन नोंदवही अतिशय गांभीर्याने तपासावेत, यात कुठेही निष्काळजीपणा होऊ न देण्याबाबत तसेच अवैधरित्या चालणारे केंद्र शोधून काढण्यासाठी स्टींग ऑपरेशनची संख्या वाढविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, राज्यासह उक्त जिल्ह्यामधील अवैध गर्भलिंग निदान करणाऱ्या संबंधिताची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

बीड, जालना व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील मुलींच्या जन्मदरात वाढ दिसून येत असून CRS पोर्टलवरील जन्मदराची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | बीड | जालना | छ.नगर |
|---|---|---|---|
| २०२२ | ८८८ | ८५४ | ८८६ |
| २०२३ | ८८३ | ८५७ | ८८० |
| २०२४ | ९६६ | ९१९ | ९२७ |

(२) व (३) लिंग निदान करण्यावर प्रतिबंध घालण्यासाठी किशोरवयीन मुलींना राष्ट्रीय किशोरवयीन स्वास्थ कार्यक्रमाद्वारे १० ते १९ वर्ष वयाच्या मुलींचे समुपदेशन करण्यात येते.

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान तंत्र प्रतिबंध कायदा १९९४ सुधारित अधिनियम २००३ अंतर्गत प्रत्येक सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांचे तीन महिन्यातून एकदा तपासणी केली जाते तपासणी दरम्यान काही त्रूटी आढळून आल्यास संबंधित केंद्रास कारणे दाखवा नोटीस काढली जाते तसेच सदर नोटीसचा खुलासा जिल्हा सल्लागार समितीसमोर ठेवून संबंधित केंद्रावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

पीसीपीएनडीटी कायद्याची प्रखर अंमलबजावणी करणे करीता उपाययोजना म्हणून दिनांक ०५/०६/२०२४ ते दिनांक ३०/०६/२०२४ दरम्यान महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एक विशेष धडक मोहीम राबविण्यात आली होती, सदरील मोहिमेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये सर्व तालुका समुचित पदाधिकारी यांच्याकडून तालुका निहाय सर्व सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांची तपासणी करण्यात आलेली आहे. गर्भलिंगनिदान करीत असल्याचा संशय आलेल्या सोनोग्राफी केंद्रावर बनावट गर्भवती (डिकॉय) महिलेच्या सहाय्याने स्टींग ऑपरेशन करुन गर्भलिंग निदान होत नसल्याची खात्री करण्यात येते व दोषी आढळल्यास कायदेशिर कार्यवाही करण्यात येते.

राज्यात सन २०२४-२५ मध्ये माहे मार्च २०२५ अखेर एकूण ९४ संशयित सोनोग्राफी केंद्रावर बनावट गर्भवती (डिकॉय) महिलेच्या सहाय्याने स्टींग ऑपरेशन करण्यात आलेले आहेत व त्यापैकी १२ केंद्रे दोषी आढळले असून त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे.

राज्यात सन २०२५-२६ मध्ये माहे एप्रिल, २५ ते मे, २०२५ अखेर एकूण १३ संशयित सोनोग्राफी केंद्रांवर बनावट गर्भवती (डिकॉय) महिलेच्या सहाय्याने स्टींग ऑपरेशन करण्यात आलेले आहेत व त्यापैकी ०१ केंद्र दोषी आढळले असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर येथे गर्भलिंग निदानाबाबत पुंडलिक नगर पोलीस स्टेशन येथे एक FIR १७७/२०२४ दाखल करण्यात आला आहे. तर जालना जिल्ह्यात अवैध गर्भलिंगनिदानाबाबत भोकरदन पोलीस स्टेशन मध्ये एक गुन्हा दाखल केला असून, सोनोग्राफी मशीन विक्रीबाबत जालना पोलीस स्टेशन येथे एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बीड जिल्ह्यात गर्भलिंगनिदान प्रकरणी २ आरोपींना अटक करण्यात आली असून १ आरोपी फरार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) * ३८८० श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजूर झालेल्या कामांना निधी प्राप्त होत नसल्याने सदर कामे प्रलंबित असून सदर इमारतीत महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालयाची जागा असून या रुग्णालयाला मंजूरी प्राप्त होऊनही अद्याप निधी उपलब्ध झाला नसल्याने वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबरोबरच महिला रुग्णालयाचे काम बंद झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाकरीता निधी उपलब्ध करुन माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत रूग्णालयाच्या जागेत सदर शासकीय मेडीकल कॉलेज व महिला रुग्णालय सुरु झाले नाही तर आंदोलनचा इशारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथील टप्पा-१ बांधकामाकरीता दिनांक १५/०१/२०२१ रोजी रुपये ४९५.४६ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सर्व निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर वैद्यकीय महाविद्यालयातील टप्पा-१ चे बांधकाम पूर्ण झाले आहे. टप्पा-२ चे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या महिला व नवजात शिशु रुग्णालय इमारतीच्या बांधकामाकरीता रुपये १७.९६ कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्रदान केली असून सदर रुग्णालय इमारतीचे बांधकाम ७०% पूर्ण झालेले आहे. महिला व नवजात शिशु रुग्णालय इमारतीचे बांधकामाकरीता सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरील दोन्ही कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्ते अपघातातील जखमींच्या उपचारांकरिता कॅशलेस योजना राबविण्याबाबत

**(३४) * ४५१३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या काही वर्षापासून रस्ते अपघातांची संख्या वाढली असून या अपघातांमध्ये अनेकांना कायमचे अपंगत्व व अनेक निष्पाप नागरिकांचे मृत्यू झाले असूनही कॅशलेश योजनेतून उपचार देण्यात येत नसल्याने सदरची योजना राज्यात अद्यापही कागदोपत्री असल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते अपघातात जखमी झालेल्या पिडीतांना कॅशलेस उपचार देण्यात याव्यात, अशी सूचना मा.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनाला दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार राज्यातील सर्व रुग्णालयाला रस्ते अपघातांतील जखमी पिडितांवर उपचार करण्यासाठी कॅशलेस योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

राज्यामध्ये दिनांक २८ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही दिनांक ०१ जुलै २०२४ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे प्रति कुटुंब प्रति वर्ष ५.०० लक्ष संरक्षण लागू आहे. योजनेत १३५६ उपचारांचा समावेश असून त्यामध्ये रस्ते अपघातासंबंधित उपचारांचाही समावेश आहे. दिनांक १/०७/२०२५ पर्यंत एकूण ७६,२१५ इतक्या रूग्णांनी रस्ते अपघातासंबंधित उपचारांचा लाभ घेतलेला आहे.
(२) रस्ते अपघात, दुखापती व जीवितास धोका असणाऱ्या बाबींचे प्रमाण कमी करण्याची केंद्र व राज्य शासनाची संयुक्त जबाबदारी असल्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ते सुरक्षा मार्गदर्शक कमिटीच्या दिनांक २९/०३/२०२२ च्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.
(३) भारत सरकार सडक परिवहन व राज्य मार्ग मंत्रालय यांनी दिनांक ५ मे २०२५ रोजीच्या राज पत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे केंद्र शासनाची "रस्ते अपघातग्रस्त रुग्णांना विमा उपचार योजना २०२५ जाहीर केली आहे.

सदरची योजना राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण व केंद्र शासन यांच्याकडून प्राप्त निर्देशानुसार लागू करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गतची पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३५) * ४१५२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेंतर्गत हर घर नल से जल ही योजना गेल्या ७ वर्षापासून राबविण्यात येत असून सन २०२४ अखेरपर्यंत ग्रामीण भागातील सर्व घरांत नळजोडणी देण्याचे उद्दीष्ट असतानाही या योजनेच्या कामात होणाऱ्या दिरंगाईमुळे आजही ६७ हजार ५७४ घरगुती नळजोडण्या देणे बाकी असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यात आतापर्यंत किती नळजोडण्या देण्यात आल्या आहेत तसेच या योजनेचे उद्दीष्ट पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास ग्रामीण भागातील नळजोडणीची कामे विहीत वेळेत होण्याकरीता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या सुरूवातीस ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात एकूण २,६१,२७५ कुटुंब होती. त्यापैकी १,९६,९४० इतक्या कुटुंबाना माहे एप्रिल, २०२५ अखेर नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(२) ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण २,६१,२७५ कुटुंबापैकी १,९७,४९१ इतक्या कुटुंबांना आतापर्यंत नळ जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

योजनेचा उद्भव कोरडा जाणे, स्थानिक अडचणी, जागांचे वाद, पाईपलाईन टाकण्यास येणाऱ्या जागांच्या अडचणी, विद्युत जोडणी मिळण्यास येणाऱ्या अडचणी इत्यादीसह सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग, राष्ट्रीय महामार्ग, जलसंपदा विभाग इत्यादी विभागांच्या परवानगी व निधीची कमतरता यामुळे योजनांची कामे पूर्ण करण्यास विलंब होत आहे.

(३) जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांचा नियतकालीक आढावा शासनस्तरावरून तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद यांच्याकडून घेतला जात असून आवश्यक संनियंत्रण ठेवण्यात येत आहे.

ज्या ठेकेदारांकडून योजनेची कामे पूर्ण करण्यास विलंब होत आहे अशा ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. विशेष बाब म्हणून राज्य सरकारकडून निधी देण्यात आला आहे. तसेच भारत सरकार कडून निधी प्राप्त करून घेण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे जोगेश्वरी (जि.छत्रपती संभाजीनगर) ग्रुप ग्रामपंचायतीस वाळूज एमआयडीसीमार्फत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याचे थकीत देयक क्षमापित करण्याबाबत

**(३६) * २४३१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जोगेश्वरी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील ग्रुप ग्रामपंचायत ही ५ गावांची असून तेथील लोकसंख्या जवळपास १ लाख आहे व सदर ग्रुप ग्रामपंचायत वाळुज औद्योगिक क्षेत्रालगत असल्याने सदर ग्रुप ग्रामपंचायतीमधील ५ गावांना वाळुज येथील एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक व रहिवाशी क्षेत्रातून जमा होणारा ५० टक्के कर हा एमआयडीसीकडे जमा होत असल्याने ग्रामपंचायतीमार्फत नागरी सुविधा, विकास कामे व दैनंदिन खर्च करण्यास जोगेश्वरी ग्रामपंचायतीला अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळुज एमआयडीसीचे या ग्रामपंचायतीकडे पाणी पुरवठ्याचे रुपये १ कोटी इतके देयक थकीत असल्याने येथील पाणीपुरवठा बंद करण्यासाठी एमआयडीसीने ग्रामपंचायतीला नोटीस दिली असून जोगेश्वरी ग्रामपंचायत अंतर्गत असलेला ५० टक्के कर हा एमआयडीसी कार्यालयाकडे जमा होत असल्यामुळे ग्रामपंचायतीचे पाणीपट्टी देयक माफ करावे यासाठी ग्रामपंचायतीने एमआयडीसीकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजे जोगेश्वरी ग्रुप ग्रामपंचायतीचे पाणी पुरवठ्याचे १ कोटी रुपयांचे थकीत देयक क्षमापित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) म.औ.वि. महामंडळाकडून ग्रुप ग्रामपंचायत जोगेश्वरी अंतर्गत जोगेश्ववरी, कमळापुर, नायगाव, रामराई व रामराईवाडी इ. गावांचा समावेश असून या गावांना म.औ.वि. महामंडळाकडून पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(२) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२०१६/ प्र.क्र.१८९ / पंरा-४ दिनांक १३ सप्टेंबर २०१९ नुसार म.औ.वि. महामंडळाच्या हद्दीत येणाऱ्या पंचायतीच्या महसुली क्षेत्रातील ग्रामपंचायत कर हा सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून म.औ.वि.महामंडळाने जमा करावा व या जमा होणाऱ्या करापैकी दरमहा ५० टक्के् कर हा ग्रामपंचायतीस वर्ग करण्याबाबत सुचित केल्यानुसार ग्रामपंचायत जोगेश्वरी अंतर्गत येणाऱ्या म.औ.वि.महामंडळाच्या हद्दीतील कारखानदारांकडून सन २०२०-२१ ते माहे मे-२०२५ पर्यंत एकूण ११९६.५५ लक्ष एवढा कर वसुल करण्यात आलेला असून त्यापैकी ५९८.२८ लक्ष ही रक्कम ग्रामपंचायतीस म.औ.वि. महामंडळाकडून वर्ग करण्यात आली आहे.
(३) ग्रामपंचायत जोगेश्वरी यांच्याकडे सन २०२१ पासून एकूण रुपये ३२७.९५ लक्ष इतकी रक्कम पाणी देयक थकबाकी प्रलंबित आहे. म.औ.वि. महामंडळाकडून इतर थकबाकीदार ग्राहकांना थकबाकी अदा करणेबाबत ज्याप्रमाणे ज्ञापने देण्यात येत असतात त्यानुसार ग्रामपंचायत जोगेश्वरी यांना देखील थकबाकी अदा करणेबाबत ज्ञापने देण्यात आलेली आहेत. पाणी पट्टी देयक माफ करण्याबाबत जोगेश्वरी ग्रामपंचायतीकडून निवेदन प्राप्त झालेले नाही
(४) म.औ.वि. महामंडळामार्फत स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडून मूळ पाणीपुरवठा थकबाकी वसुल होण्यांच्या दृष्टीने विशेष अभय योजना सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आली होती, या योजनेनुसार ज्या ग्रामपंचायती अथवा स्थाीनिक स्वराज्य संस्था थकीत पाणी देयकापैकी मूळ रक्कम योजना जाहीर झाल्यापासून ४ महिन्यांच्या आतमध्ये अदा करतील तसेच पुढील १२ महिने येणारे पाणी देयक विनाव्यत्यय अदा करतील अशा स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर कोटयावरील जास्तीचा पाणी वापर, जलमापक नादुरुस्ती पोटी, विलंब शुल्कापोटी आकारणी करण्यात आलेली रक्कम माफ करण्याकरीता ही योजना लागु करण्यात आली होती. त्यानुसार सदर योजना लागु झाल्यापासून पहिल्या ४ महिन्याच्या आत पहिला हफ्ता भरणे आवश्यक होते. तथापि, सदर अभय योजनेचा लाभ घेण्याबाबत आवश्यक ती कोणतीही कार्यवाही ग्रुप ग्रामपंचायत जोगेश्वरी यांचेकडून करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे परशुराम (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपनीत लागलेल्या आगीमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(३७)** * **४४०८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे परशुराम (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील लासा सुपरजेनेटिक कंपनीत लागलेल्या आगीत कंपनी जळून नष्ट झाली असल्याचे निदर्शनास आले असून या कंपनीपासून काही तासांच्या अंतराने असलेल्या ॲक्वीला ऑरगॅनिक कंपनीत झालेल्या रीॲक्टरच्या स्फोटात एका कामगाराचा मृत्यू आणि एक कामगार गंभीर जखमी झाला असल्याची घटना दिनांक १८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू घटनेस जबाबदार असणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच सदरहू दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना आणि जखमी कामगारांना तातडीने आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

लासा सुपरजेनेटिक लि., एम.आय.डी.सी. लोटे परशुराम, ता.खेड, जि.रत्नागिरी या कारखान्यात दिनांक १८/०५/२०२५ रोजी लागलेल्या आगीच्या घटनेत कारखान्यातील मुख्य विद्युत पुरवठा केबल्स, मशीन केबल्स, छतावरील काही पत्रे, कच्चा माल व पक्का माल जळाले. तथापि, सदर आगीमध्ये कंपनी जळून नष्ट झालेली नाही. सदर आगीच्या घटनेमध्ये कोणीही जखमी अथवा मृत झालेले नाही.

तसेच याच औद्योगिक वसाहतीतील ॲक्विला ऑरगॅनिक्स प्रा.लि, या कारखान्यात दिनांक १८/०५/२०२५ रोजी लागलेल्या आगीच्या घटनेत रिॲक्टरचा स्फोट झालेला नसून रिॲक्टरच्या साफसफाईचे काम सुरू असताना वेल्डिंग स्पार्कच्या संपर्कात येऊन रिॲक्टरच्या आजुबाजुला आग पसरली. सदर घटनेमध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला व एका जखमी कामगारास उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

(२) लासा सुपरजेनेरिक्स लि. या कारखान्यास संचालनालयाकडून बंदची नोटीस पाठविण्यात आलेली आहे. तसेच कारखान्याच्या भोगवटादारा विरुध्द प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, खेड, जि.रत्नागिरी यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे. सदर आगीच्या घटनेमध्ये कोणीही जखमी अथवा मृत झालेले नाही.

ॲक्विला ऑरगॅनिक्स प्रा.लि, या कारखान्यातील चौकशीमध्ये आढळलेल्या भंगाबाबत कारखाना भोगवटादारा विरुध्द प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, खेड, जि.रत्नागिरी यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

कारखाना व्यवस्थापनाकडून मृत कामगाराच्या वारसांना रुपये ६० लाख सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

तसेच मृत कामगार हा “युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि.” या विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असून त्याच्या नुकसान भरपाईबाबत दावा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेतील जखमी कामगाराचा औषधोपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाकडून करण्यात आला असून रजा काळातील पूर्ण वेतन अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.